MHRG170004282024

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २८/२०२४
## निशाणी क्र. १४ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्जदार यांनी विलंब माफी अर्जासोबत दाखल केलेले पुननिरिक्षण अर्ज फौजदारी अपील म्हणून समजणेकरिता व तशी दुरुस्ती विलंब माफी अर्जामध्ये करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर दुरुस्ती अर्जाला सामनेवाला यांनी नि.१८ येथे म्हणणे सादर करुन जोरदार हरकत उपस्थित केली आहे.

२. अर्ज, म्हणणे व कागदपत्रे पाहिली. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अपिलार्थी यांनी नि.१९ येथे त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे.

३. प्रस्तुत प्रकरण हे अर्जदार यांनी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांनी फौजदारी किरकोळ अर्ज नं.२३०/२०२३ मध्ये दिलेल्या आदेशाविरुध्द व्यथीत होवून दाखल केलेला आहे. वास्तविक, सदर आदेशानुसार महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणारा कायदा २००५ कलम २९ नुसार अपिल दाखल करणे अपेक्षित आहे. परंतु, अर्जदार यांनी पुननिरिक्षण अर्ज दाखल केलेला आहे. सदरची चूक ही तांत्रीक स्वरुपाची आहे. अर्जामध्ये पुननिरिक्षण अर्जाऐवजी अपील असे दुरुस्ती करणेस परवानगी दिलेस तसेच पुननिरिक्षण अर्ज हा अपिल म्हणून समजले तर सामनेवाला यांचे काही नुकसान होणार नाही. त्यामुळे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१.** अपीलार्थी यांचा अर्ज नि.१४ हा रुपये १०००/- चे खर्चावर

मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम रुपये १०००/–ही तालुका विधी सेवा प्राधिकरण, पनवेल येथे जमा करावी.

३. अपीलार्थी यांनी नि.१४ च्या अर्जामध्ये मागितल्याप्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती विलंब माफी अर्जामध्ये सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांत करावी.

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2026.03.17 17:56:18 +0530

पनवेल. (संतोष रा. चव्हाण)

दिनांक १७/०३/२०२६ जिल्हा न्यायाधीश–४, पनवेल–रायगड.